जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नगर जिल्ह्यासह राज्यभरात मुसळधार पाऊस

*(पान १ वरुन)*

कोपरगाव ६.५ व श्रीरामपूर ३६.९ मिमी.

रात्रीच्या पावसाने शेवगाव तालुक्यातील २०, नेवासे तालुक्यातील २५ व कर्जतमधील दोन अशा एकूण ४७ घरांची पडझड झाली. याशिवाय शेवगाव तालुक्यातील विविध ठिकाणच्या ३५ तर नेवासे तालुक्यातील २७ घरांना पुराच्या पाण्याचा फटका बसला आहे.

### सीना नदीला पुन्हा आला महापुर

नगर तालुक्यातील जेऊर, ससेवाडी पट्ट्यात झालेल्या जोरदार पावसामुळे सीना नदीला महापूर आला होता. जेऊर गावातील बाजारपेठेत पाणीच पाणी झाले होते. बाजारपेठेतून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असल्याने नागरिकांचा सुमारे दोन तास गावाशी संपर्क तुटला होता. परिसरातील सर्व शाळांना सुट्ट्या देण्यात आल्या होत्या. काही विद्यार्थी शाळेत आल्यामुळे सीना नदीच्या पुरामुळे गावांमध्ये अडकले होते. संतुकनाथ विद्यालयाचे प्राचार्य शांताराम नवले यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्व पालकांना व्यवस्थित मार्गदर्शन केल्याने विद्यार्थ्यांना फायदा झाला.

### करंजी गावात घुसले पावसाचे पाणी

रात्री झालेल्या ढगफुटी सदृश पाऊसामुळे शेवगांव-अ.नगर रस्ता बंद झाला आहे. पाथर्डी तालुक्यातील तिसगांव च्या वेशी पर्यंत पाणी असून संपूर्ण पूल पाण्याखाली आहे तसेच करंजी गावा जवळ असलेल्या तलावतील पाणी करंजी गावात घुसल्याने अनेक घरात पाणी साचले आहे. संपूर्ण करंजी गांव व महादेव मंदिर सुद्धा पाण्यात आहे.

### जामखेड रोडवर पूल वाहून गेला

नगर ते जामखेड रस्त्यावर सारोळा बद्धी (ता. नगर) येथील पूल जोरदार पावसामुळे वाहून गेला. त्यामुळे वाहतूक ठप्प झाली आहे. या रस्त्याचे काम सुरू आहे. वाहतूक वळविण्यासाठी बांधण्यात आलेला पूल जोरदार पावसामुळे वाहून गेला आहे. चिचोंडी पाटील दौलवडगाव, केळ, बांधखेल या परिसरात मोठी ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने केळ येथील तलाव भरला असून चिचोंडी पाटील तलाव भरलेला आहे. त्यामुळे चिचोंडी पाटील परिसरातील वाड्या वस्त्यांचा संपर्क तुटला आहे. या शिवाय जामखेड रोडवर कडा (ता. आष्टी) येथील कडी नदीला पूर आल्याने रस्त्यावरील पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. जामखेड रोडवर सारोळा बद्दी, धानोरा आणि कडा अशा तीन ठिकाणी रस्ता बंद झाला आहे.

### पुरात अडकलेल्यांच्या बचावासाठी लष्कराला पाचारण

कडा (ता. आष्टी) येथे पुरात अडकलेल्या नागरिकांच्या बचावासाठी लष्कराला पाचारण करण्यात आले आहे. हेलिकॉप्टर घेऊन लष्करी पथक दाखल झाले असून नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्याचे काम सुरू आहे. आमदार सुरेश धस कड्यात बचाव कार्यावर देखरेख ठेवून आहेत.

तर नगर जिल्ह्यात पाथर्डी तालुक्यात जेसीबीच्या सहाय्याने मदतकार्य सुरू आहे. पुरात अडकलेल्यांना जेसीबीच्या सहाय्याने सुरक्षित ठिकाणी नेण्यात येत आहे. रस्ते बंद झालेल्या ठिकाणी जेसीबीच्या सहाय्याने आवश्यक साहित्य पुरविले जात आहे.

### प्रशासनाकडून नागरिकांना सूचना

मेघगर्जना होत असताना झाडाखाली, टॉवर, ध्वजांचे खांब किंवा धोकादायक ठिकाणी उभे राहू नये. विद्युत उपकरणांचा वापर टाळावा. नदी, ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी पाणीपातळी वाढल्यास सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. पाण्याने भरलेले पूल ओलांडू नयेत,

मोकळ्या जागी असल्यास गुडघ्यावर बसून डोके झाकून घ्यावे.

जनावरांचे स्थलांतर सुरक्षित ठिकाणी करावे व शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी नियोजन करावे.

पर्यटनासाठी धरणे, नद्या व धबधब्यांच्या परिसरात जाणे टाळावे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रांमध्ये पाण्याच्या प्रवाहाजवळ जाण्याचे टाळावे.

आपत्कालीन परिस्थितीत स्थानिक पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय किंवा जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा.

जिल्हा नियंत्रण कक्षाचा टोल-फ्री क्रमांक १०७७ असून दूरध्वनी क्रमांक ०२४१-२३२३८४४ व २३५६९४० उपलब्ध आहेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.



**जुनी इमारत कोसळून कारचे नुकसान** नगर शहरातील अर्बन बँकेसमोर जुनी इमारत एका कार वर कोसळून त्या कारचा चुराडा झाला आहे. अशा अनेक धोकादायक इमारती नगर शहरात असून महापालिका केवळ या इमारतींना नोटीसा देत आहेत. पण कारवाई काहीही होत नाही. या घटनेत एखादी जीवित हानी झाली असती तर याला जबाबदार कोण? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. (छाया : ऋषिकेश गुंडला)



काल मध्यरात्री सुरू झालेल्या पावसाने आज दिवसभर उघडीप दिली नाही सकाळी धुके पडले ८ वाजले तरी वाहने दिवे लावून मार्ग काढत होते (छाया - विजय मते)

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शाळा बंद करण्याचा अधिकार शालेय व्यवस्थापन समित्यांना

नगर - जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन शाळांना सुट्टी देण्याचा अधिकार ग्रामस्तरावरील शालेय व्यवस्थापन समित्यांना प्रदान करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने या संदर्भात आदेश निर्गमित केले. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हाधिकारी हे प्राधिकरणाचे अध्यक्ष असून शासनाच्या परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. जिल्ह्यातील १९ महसूल मंडळांत अतिवृष्टी झालेली असून पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील काही गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. तसेच भारतीय हवामान खात्याने जिल्ह्यासाठी अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर १५ व १६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत आवश्यकता असल्यास शाळा बंद ठेवण्याबाबतचा निर्णय शालेय व्यवस्थापन समिती घेऊ शकेल. सर्व मुख्याध्यापकांनी समिती अध्यक्षांसह बैठक घेऊन स्थानिक परिस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे. तथापि या कालावधीत मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनासंबंधी कामकाज करणे बंधनकारक राहील, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# प्रारूप प्रभाग रचना नागरिकांसाठी की सत्ताधाऱ्यांच्या राजकीय सोयीसाठी ?

### राजकीय हस्तक्षेपाचा आरोप करत १४ मुद्यांवर हरकत

नगर - प्रारूप प्रभाग रचनेच्या हरकत, सूचनांच्या शेवटच्या दिवशी शहर ठाकरे शिवसेनेने एकत्रितरित्या विविध चौदा मुद्यांवर हरकती नोंदवल्या. पुनर्रचनेत नागरिकांची गैरसोय झाली आहे. केवळ विरोधकांची कोंडी करण्याचा गैर हेतू आहे. शिवसेनेचा पारंपारिक मतदार, बालेकिल्ला असणाऱ्या सर्वच प्रभागांची आक्षेपार्हरित्या मोडतोड केली आहे. विशेषत: सन २०१८ च्या रचनेतील प्रभाग क्रमांक ७, ८, १०, १२, १३, १५, १६ या शिवसेनेच्या सर्वच प्रभागांची मोठ्या प्रमाणावर मोडतोड करण्यात आली असल्याचे म्हणत, प्रक्रियेत वारेमाप राजकीय हस्तक्षेप झाला असल्याचा आरोप शहरप्रमुख किरण काळे यांनी केला आहे. प्रारूप रचना नागरिकांसाठी की सत्ताधाऱ्यांच्या राजकीय सोयीसाठी आहे, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना देखील हरकती सादर करण्यात आल्या आहेत.

हरकतींत म्हटले आहे की, विविध तथ्ये, कारणे लक्षात घेता, २०२५ साठीची रचना तात्काळ रदद करा. नव्याने रचना जाहीर करुन हरकत व सुचना मांडण्यासाठी नवीन तारीख जाहीर करा. सन २०१८ व २०२५ या दोन निवडणुकां करिता २०११ च्याच जनगणनेचा आधार घेतला आहे. तरी जुन्या प्रभागांची मोडतोड केली आहे. लोकसंख्या वाढलेली नसताना, कोणताही नवा भाग मनपा हद्दीत समाविष्ट झालेला नसताना देखील प्रभाग रचना पुनर्गठीत करण्यात आली आहे. हे अत्यंत आक्षेपार्ह आहे. सबब २०१८ च्या रचने प्रमाणेच निवडणूक घ्यावी. प्रभाग रचनेचे कामकाज हे काही सत्ताधारी राजकीय नेत्यांच्या खाजगी कार्यालयात बसून मनपा अधिकाऱ्यांनी केले आहे. गोपनीयतेचा भंग झाला आहे.

पुढे म्हटले आहे, मनपाने आपल्या संकेतस्थळावर प्रगणक गटांचे नकाशे, गटनिहाय लोकसंख्या दर्शविणारे परिशिष्ट - ३, ४, प्रभाग निहाय ब नकाशे जाणीवपूर्वक प्रसिद्ध केले नाही. यामुळे नागरिक वस्तुस्थिती बाबत अनभिज्ञ आहेत. नकाशांवर आयुक्त, उपायुक्त, नगर रचनाकारांच्या सह्या अनिवार्य असूनही नाहीत. सदर नकाशे हे राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यते शिवाय आयोगाची दिशाभूल करत बेकायदेशीर रित्या जाहीर केल्याचे दिसते आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर आहे.

प्र. १७ च्या रचनेत आदेशातील ५.५.२ च्या तरतुदीचे उल्लंघन झाले आहे. रेल्वे रूळ, रेल्वे फ्लाय ओव्हर, नगर - दौंड महामार्ग ओलांडून भौगोलिक सलगता तोडत काही भाग केडगावला जोडला आहे. सन २०१८ प्रमाणे आरक्षण जाहीर केलेले नाही. प्र. १३ ची रचना करताना पुणे - अहिल्यानगर - छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील उड्डाण पुलाची सीमा ओलांडली आहे. त्यामुळे भौगोलिक सलगते अभावी नागरिकांची गैरसोय झाली आहे. प्र. १४ हा शहर लोकप्रतिनिधींचा स्वतःचा प्रभाग आहे. प्र. १ ते १७ मध्ये हाच एकमेव प्रभाग असा आहे की ज्यामध्ये पूर्वाश्रमीचा बहुतांश भाग आहे तसाच ठेवला आहे. राजकीय दबावातून हे करण्यात आले आहे. प्रशासनाने आपण सर्व पक्षांसाठी समान असून नागरिकांच्या व्यापक हितार्थ काम करतो हे दाखवून द्यावे.

पुढे म्हटले आहे, प्र. १ मध्ये सीना नदी ओलांडून नागापूर गावठाणचा समावेश केला आहे. यापूर्वीच्या रचनेत सदर भाग हा शिवसेनेचा बालेकिल्ला असणाऱ्या पूर्वीच्या प्र. ७ मध्ये समाविष्ट होता. प्र. ५ ची रचना करताना पत्रकार वसाहत चौक ते डीएसपी चौक, नगर - मनमाड रोड, नगर - छत्रपती संभाजीनगर रोड या तीन मुख्य रस्त्यांना ओलांडून, तसेच अनेक मागासवर्गीय वस्त्यांना विभागून प्रभाग रचना करण्यात आली आहे. मागासवर्गीय बांधव, अल्पसंख्यांक समुदाय असणाऱ्या रहिवासी भागांचे अत्यंत नियोजनबद्धरित्या मार्गदर्शक सूचनांना डावलून द्विभाजन, त्रिभाजन करत टार्गेट केले गेले आहे. राजकीय आकस भावनेतून सत्ताधारी, प्रशासनाने संगनमतातून हे केले असल्याचे ठाकरे शिवसेनेने म्हटले असून यावर हरकती नोंदविल्या आहेत.

# नैसर्गिक हद्द सोडून अनेक प्रभागाची रचना झाल्याबद्दल अहिल्यानगर महापालिकेकडे हरकत, आक्षेप व सूचना

नगर - महावीर पोखरणा यांनी अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रारूप प्रभाग रचनेविषयी हरकत व आक्षेप घेतला आहे. त्यात राज्य निवडणूक आयोगाच्या नियमाप्रमाणे प्रत्येक प्रभाग हा भौगोलिक दृष्टया सलग असला पाहिजे त्याची सीमा रेषा रस्ते, गल्ल्या, नद्या नाले, डोंगर, महसूल विभागाच्या नोंदी, डीपी रस्त्याच्या सीमा, मोठे रस्ते, फ्लायओव्हर, रेल्वे लोहमार्ग इ. विचारात घेऊन निश्चित करण्यात येते व सदर प्रभाग रचना ही चौकोनी किंवा आयताकृती असावी असा नियम आहे पण शहरातील अनेक प्रभागात प्रारूप रचना करताना नैसर्गिक सीमा रेषा ओलांडण्याचे प्रकार सर्रास घडले आहेत. रस्तेही ओलांडण्यात आले आहेत. तसेच वार्ड रचना करताना दिशानियाय सीमांकन (वॉर्ड कोठून सुरू होतो व कोठे संपतो) त्याचे फलक लावणे गरजेचे होते तेही केलेले नाही. वॉर्डरचना फक्त निवडणुकीपुरतीच नसते, तर नंतरच्या काळात नागरी सुविधा देण्यासाठी वॉर्ड हेच युनिट गणले जाते, त्यामुळे केलेली प्रभागरचना अत्यंत चुकीची झाली आहे. शहरात महापालिकेचे प्रशासकीय कामकाज चार प्रभाग समिती द्वारे चालते परंतु अनेक ठिकाणी पूर्वीच्या दोन या तीन प्रभाग समितीमधील भाग एकत्र आलेले आहेत. प्रभाग रचना करताना एका इमारतीचे, मळ्याचे,चाळीचे अथवा घराचे विभाजन दोन प्रभागामध्ये होणार नाही याची दक्षता घेण्यात येते परंतु सदर नियमाचे या प्रारुप रचनेत उल्लंघन झालेले आहे तसेच अनेक प्रगणक गट फोडलेले दिसत आहेत. प्रभाग रचना ही नागरिकांच्या हिताची न करता काही राजकीय पक्षांना सोयीचे राजकारण व्हावे हा दृष्टीने केल्याचे दिसते.

निवडणुका झाल्यानंतर नागरिकांना नागरी समस्येबाबत मोठी अडचण येणार आहे. प्रभागरचना करताना गूगल मॅपिंग, ड्रोन कॅमेरा बरोबर त्याचा समक्ष सर्व्हे होणेही गरजेचे आहे परंतु तसे केलेले दिसत नाही. तसेच केलेल्या गुगल मॅपिंग, नकाशावर प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या ही नाहीत त्यामुळे प्रबळ दावेदारांना डोळ्यासमोर ठेवून प्रभागरचना केलेली आहे. आठ ते नऊ कि.मी. लांबीचा प्रभाग तयार केला आहे त्यामुळे त्याचा उमेदवारांबरोबर नागरिकांनाही फटका बसणार आहे. निवडून आल्यानंतर समस्या सोडविण्यासाठी नगरसेवकांकडे जाण्याची वेळ आल्यास नागरिकांना ते गैरसोयीचे होणार आहे. प्रभागाची मोठी तोडफोड केल्याने निवडणुका झाल्यानंतर शहरात असणाऱ्या चार प्रभाग समितीचे कार्यक्षेत्र ही बदलावे लागणार आहे त्यामुळे नागरिकांची मोठी परवड होणार आहे तसेच विस्कळीतपणा येणार आहे त्यामुळे प्रभाग क्षेत्र समिती निहाय प्रारूप वार्ड रचना होणे आवश्यक आहे .

शहरातील १७ प्रभागात असणारे मनपाचे ३०००० विद्युत पोल चे विद्युत पोल सर्वेक्षण होऊन त्यावर प्रभाग नुसार वार्ड क्रमांक, विद्युत पोल क्रमांक सदर पोलवर टाकलेले आहेत परंतु आता प्रभाग फेर रचना झाल्याने पालिकेच्या खर्चात भर पडून नागरिकांचा गोंधळ ही उडण्याची शक्यता आहे त्यामुळे पूर्वीचे असणारे प्रभाग क्रमांक बदलू नयेत तसेच प्रत्येक प्रभागाची ओळख म्हणून सर्व १७ प्रभागास नावे ही देण्यात यावेत.

प्रभाग क्रमांक मध्ये ५ मध्ये सावेडी उपनगरातील अनेक भागांचा समावेश आहे. या प्रभागात झेंडीगेट- मुकुंदनगर प्रभाग समिती अंतर्गत असणारा पुणे-औरंगाबाद हा राष्ट्रीय महामार्ग ओलांडून असलेला गोविंदपुरा, फकिरवाडा हा भाग समाविष्ट केलेला आहे असाच प्रकार अनेक प्रभागात झालेला आहे.महामार्ग तोडून केलेल्या आश्चर्यकारक समावेशाबाबत मोठी शंका निर्माण होत आहे .

उपरोक्त सूचना, आक्षेप व हरकती विचारात घेऊन अंतिम नव्याने प्रभाग रचना करावी, अशी मागणीही महावीर पोखरणा यांनी केली आहे.


## प्रल्हादराव शितोळे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - समाज कल्याण विभाग महाराष्ट्रचे माजी अतिरिक्त संचालक प्रल्हादराव हनमंतराव शितोळे (वय ९०) यांचे १४ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. रविंद्र शितोळे यांचे ते वडील होत.

## एकनाथ भिंगारदिवे यांचे हृदयविकाराने निधन



भिंगार - पंचशीलनगर भिंगार येथील रहिवासी एकनाथ मारुती भिंगारदिवे (वय ६२) यांचे १३ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, २ भाऊ, भावजया, पुतणे, सुना, नातवंडे, जावाई असा मोठा परिवार आहे. भिंगार येथील हॉटेल पंचरत्नचे प्रसाद व सुदर्शन भिंगारदिवे यांचे ते बंधू होत.

## मच्छिंद्रराव कदम यांचे अल्प आजाराने निधन



नगर - भूषणनगर केडगाव येथील रहिवासी मच्छिंद्रराव सखाराम कदम (वय ८८) यांचे १५ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. केडगाव अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, ५ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मिलिंद कदम यांचे ते वडील होत.

## अतुल वामन यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील अतुल उर्फ राजूभाऊ लक्ष्मण वामन (वय ४५) यांचे १४ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सासू, सासरे, चुलत भाऊ, चुलत्या, चुलत बहिणी असा परिवार आहे. माजी नगरसेवक गणेश वामन यांचे व माजी नगरसेविका सोनाली चितळे यांचे चुलत बंधू होत.

## राहुल राऊत यांचे अल्प आजाराने निधन



नगर - आर.के. पेपरचे संचालक राहुल रेवजी राऊत (वय ५३) यांचे १४ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई असा परिवार आहे. रंजन राऊत यांचे ते वडील होत.

## रोहिदास पवार यांचे अल्प आजाराने निधन




नगर - तालुक्यातील गुंडेगाव येथील रहिवासी बांधकाम व्यावसायिक रोहिदास एकनाथ पवार यांचे १५ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, भाऊ, पुतणे असा परिवार आहे. ते मंदिर बांधकाम व्यावसायिक तसेच वृत्तपत्र वितरक अंबादास एकनाथ पवार यांचे बंधू होत.

## गिरीजा काकडे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - केडगाव उपनगरातील शाहूनगरमधील रहिवाशी गिरीजा महादेव काकडे (वय ८१) यांचे १२ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त कर्मचारी होत्या. स्वस्त धान्य दुकानदार राजेश काकडे व पंचायत समितीतील अभियंता प्रकाश ऊर्फ हर्षल काकडे व ज्योती शिंदे यांच्या मातोश्री होत. त्यांच्यामागे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## शांताराम शेटे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील नेहरु भाजी मार्केट मधील भाजीपाल्यांचे विक्रेते शांताराम शंकरराव शेटे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नंदकिशोर, विलास, विजय, संजय, अजय व योगेश शेटे यांचे चुलते होत

## अनिल वायकोस यांचे दु:खद निधन



छत्रपती संभाजीनगर - चौराहा येथील रहिवासी अनिल विश्वनाथराव वायकोस (वय ५७) यांचे १२ सप्टेंबर रोजी सकाळी ९.४५ वाजता आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कैलासनगर स्मशानभूमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, भाऊ, बहिणी असा परिवार आहे.


पीव्हीसी कारपेट, उडन स्ट्रीप-फ्लोरिंग, वॉलपेपर, वेलवेट कारपेट, गालिचा, रोमन-रोलर- व्हर्टिकल्स - क्लॉथ कर्टन्स व कर्टन्स फिटिंग, सोफा व सोफा मटेरियल,मॅट, मॅटिंग,
रबर मॅट, सॉफ्ट - हार्ड मॅट, ग्रीन ग्रास, हिरवी जाळी, मच्छर जाळी, प्लास्टिक मॅट-चटई, कुशन्स-पिलोज, बेडशीट, ब्लँकेट, सोफा कव्हर्स, योगा मॅट, क्लिनिंग मटेरियल
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# अहमदनगर महाविद्यालयात १८ व १९ रोजी आंतरराष्ट्रीय जीवन विज्ञान परिषद

## जगभरातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार, परिषदेचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. भूषण पटवर्धन भूषवणार

नगर – अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर तर्फे दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय परिषद – जीवन विज्ञानातील अलीकडील शोध व नवकल्पना (ICRDILS-२०२५) या परिषदेला भारतासह अमेरिका, इटली, स्पेन, आयर्लंड या देशांतील शास्त्रज्ञ, संशोधक, उद्योग तज्ज्ञ उपस्थित राहणार असून, १८ व १९ सप्टेंबर रोजी हॉटेल अक्षय पॅलेस, अहिल्यानगर येथे हा कार्यक्रम पार पडणार आहे. जीवन विज्ञानाच्या माध्यमातून आरोग्य, शेती, पर्यावरण व औद्योगिक विकास यामध्ये संशोधनाच्या नव्या संधी या परिषदेत चर्चेला येणार आहेत.





प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन

या परिषदेत डॉ. जयप्रकाश मुळीयिल (सी.एम.सी., वेल्लोर), डॉ. शार्मिला बापट (एन.सी.सी.एस., पुणे), डॉ. अरविंद नाटू (आय.आय. एस.ई.आर., पुणे), डॉ. राहुल भांबुरे व डॉ. सी. के. जॉन (एन.सी.एल., पुणे), डॉ. सुजीथ नीरक्कल (आयर्लंड), डॉ. क्रिस्तीना एलामेरो (स्पेन) यांच्यासह अमेरिका व भारतातील संशोधकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. विशेष म्हणजे या परिषदेचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ वैज्ञानिक व राष्ट्रीय संशोधन प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन भूषविणार आहेत. तसेच या कार्यक्रमासाठी अमेरिकेतील डॉ. मनोहर फर्टाडो यांचे सहकार्य मिळाले आहे.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून संशोधन व ज्ञानाचा वारसा जपणाऱ्या अहमदनगर महाविद्यालयाने या परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व स्थानिक संशोधकांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. बी.पी.एच.ई. सोसायटीचे चेअरमन तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन होत आहे. जीवन विज्ञान विभाग व जॉन बार्नबस पदव्युत्तर शाळा फॉर बायॉलॉजिकल सायन्सेस या माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने या परिषदेचे नियोजन करण्यात आले असून, देश–विदेशातील विद्वानांचा मेळा यामुळे जमणार आहे.

या परिषदेतून नवनवीन संशोधनाला चालना मिळेल, जागतिक स्तरावरील तज्ज्ञांचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत व शिक्षकांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. जीवन विज्ञानाशी निगडित संशोधनातील आंतरराष्ट्रीय प्रवाह समजून घेण्यासाठी व उद्योग, आरोग्य व पर्यावरण क्षेत्राला नवीन दिशा मिळवून देण्यासाठी ही परिषद महत्त्वाची ठरणार आहे. इच्छुक संशोधक व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक सचिव डॉ. इव्हान अराणा यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ९८४५७ ०००५२ किंवा ई–मेल international.conference.2025aca.edu.in वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


डावरे गल्ली येथील श्री पावन मुंजोबा गणेश मंदिराच्या जिर्णोद्धार कामाचे भूमिपूजन करताना आ.संग्राम जगताप.

# श्री पावन मुंजोबा गणेश मंदिराच्या जिर्णोद्धाराचे भूमिपूजन

नगर – डावरे गल्लीतील श्री पावन मुंजोबा गणेश मंदिराच्या जिर्णोद्धार कामाचे भूमिपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी गणेश भोसले, संजय चोपडा, संग्राम रासकर, गोविंद मिसाळ, लक्ष्मण खामकर, लंकेश हरबा, सतीश हरबा, वसंत शेलार, आरतीताई रासकर, बाळासाहेब मिसाळ, ओंकार घोलप, योगेश मिसाळ, रुपेश हरबा, उमेश गीते, राहुल पंगुडवाले, शंकरराव पंगुडवाले, उमेश मिसाळ, आसाराम रासकर, श्रीकांत पेंटा, माधवराव ढवळे, किशोर मुथा, विजय शेलार, भरत चांडवले, विठ्ठल गाढवे, सुभाष जवळेकर, विलास गीते उपस्थित होते.

या जिर्णोद्धार कार्याचा पुढाकार सौ. आरती संग्राम रासकर व रासकर परिवाराच्या वतीने घेण्यात आला आहे. स्वागत संग्राम रासकर यांनी केले. सूत्रसंचालन बाळासाहेब मिसाळ यांनी केले. रुपेश हरबा यांनी आभार मानले.

# टीईटी सक्तीला शिक्षक भारतीचा विरोध

नगर – शिक्षक भारती संघटनेच्या नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत सर्वोच्च न्यायालयाच्या टीईटी सक्तीच्या निर्णयाला विरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत समाजवादी नेते आणि माजी आमदार कपिल पाटील, राज्याध्यक्ष अशोक बेलसरे, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, राज्यसचिव सुनील गाडगे आदी उपस्थित होते.

बैठकीत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा संदर्भ देत संघटनेने स्पष्ट केले की, पाच वर्षांपेक्षा जास्त सेवा असलेल्या सर्व शिक्षकांना टीईटी देणे बंधनकारक ठरवणे अन्यायकारक आहे. हा निर्णय एका अल्पसंख्याक संस्थेच्या प्रकरणाशी निगडीत असून, तो सरसकट सर्व शिक्षकांना लागू करणे योग्य ठरणार नाही, असे मत यावेळी मांडण्यात आले असे सुनील गाडगे यांनी सांगितले.

### निरपराध शिक्षकांना त्रास नको

बोगस शालार्थ आयडी संदर्भात दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी संघटनेने केली. मात्र, सर्वच शिक्षकांचे वेतन थांबवणे हा अन्याय असून निरपराध शिक्षकांना त्रास होऊ नये, याकडे शासनाने लक्ष द्यावे, असे नेते म्हणाले. शिक्षकांचे अभिलेख ऑनलाइन अपलोड करणे, टीईटी सक्ती, तसेच राज्यव्यापी शिक्षक साहित्य संमेलन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरही बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

### रस्त्यावर उतरून लढा देण्याची तयारी

या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असली तरी शासनाची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे शिक्षकांनी घाबरण्याचे कारण नाही, असे संघटनेचे म्हणणे आहे. जुन्या नियुक्त्यांचे नियम आणि नव्या भरतीतील अटी यात तफावत असल्याने स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करावीत, अशी मागणी बैठकीतून करण्यात आली. शासनाची भूमिका जाहीर झाल्यानंतर शिक्षक भारती कायदेशीर मार्गाने आणि गरज पडल्यास रस्त्यावर उतरून लढा देईल, असा इशाराही नेत्यांनी दिला.

शासनाची भूमिका स्पष्ट होईपर्यंत शिक्षकांनी अस्वस्थ होऊ नये. शिक्षक आणि शिक्षणाच्या हितासाठी शिक्षक भारती सदैव आघाडीवर राहील, असे आवाहन कपिल पाटील, राज्याध्यक्ष अशोक बेलसरे, कार्याध्यक्ष सुभाष मोरे आणि संजय वेतूरकर यांनी केले.

या ऑनलाइन बैठकीला सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, पुणे विभागीय कार्याध्यक्ष तथा जिल्हा सचिव महेश पाडेकर, संजय पवार, सोमनाथ बोंतले, जिल्हा महिला अध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी, कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, सुदाम दिघे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिक जिल्हाध्यक्ष रामराव काळे, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, तसेच विनाअनुदानितच्या राज्याध्यक्षा रूपाली कुरूमकर आदी उपस्थित होते.


शहरातील विविध स्वयंसेवी संस्था व संघटनांच्या वतीने स्वच्छतेच्या जनजागृतीसाठी रॅली काढण्यात आली.

# रस्त्यावर कचरा नकोच, नाही सहन होणार रस्त्यावरील घाण आता; हातामध्ये फलक, ओठांवर घोषणा घेऊन नागरिकांची स्वच्छता रॅली

नगर – शहरातील दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, मात्र प्रशासन आणि नागरिक याबाबत शांत व निष्क्रिय असल्याचे चित्र आहे. या परिस्थितीला वाचा फोडण्यासाठी काही स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते एकत्र आले. हातात फलक, ओठांवर स्वच्छतेच्या घोषणा देत त्यांनी सावेडी उपनगरातून स्वच्छता रॅली काढली. रस्त्यावर कचरा नकोच आता..., नाही सहन होणार रस्त्यावरील घाण आता..., स्वच्छ अहिल्यानगर सुंदर अहिल्यानगर...,, नको प्लॅस्टिक कापडी पिशवी हा पर्याय... अशा घोषणा देण्यात आल्या.

विविध सामाजिक संस्था व संघटनांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वच्छ रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीत नागरिक पायी चालत व काही सायकल चालवत सहभागी झाले. सावेडी येथील जॉगिंग पार्क मैदानावर स्वच्छता समितीच्या प्रमुख प्रतिभा धुत यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीस प्रारंभ केला.

जनजागृतीसाठी घोषणा देत ही रॅली कलानगर, गुलमोहर रोड, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड, भिस्तबाग चौक, कृष्ण‍धाम रोड, प्रोफेसर कॉलनी चौकातून जॉगिंग पार्क येथे या रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी स्वच्छतेची शपथ देण्यात आली. स्वागत हरीयालीचे अध्यक्ष सुरेश खामकर यांनी केले. प्रास्ताविक प्रा. दादासाहेब करंजुले यांनी केले. सूत्रसंचालन राजेश परदेशी यांनी केले. या रॅलीमध्ये रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल, रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनी, रोटरी क्लब ऑफ मिडटाउन, रोटरी क्लब ऑफ डिग्निटी, रोटरी क्लब ऑफ इंटिग्रिटी, लायनेस क्लब ऑफ अहिल्यानगर, अहिल्यानगर सायक्लिस्ट असोसिएशन, निरंजन सेवाभावी संस्था, युवान, ब्ल्यु जेम फाउंडेशन, शासकीय तंत्रनिकेतन, इंडियन डेंटल असोसिएशन नगर ब्रँच, तेजोदीप, महेश्वरी युवा संघ, अहिल्यानगर फिटनेस वर्ल्ड, माझी बाग, इंडीयन मेडीकल असोसिएशन आदी संस्था सहभगी झाल्या होत्या.

रॅलीच्या यशस्वितेसाठी प्रशांत दरेकर, सुभाष गर्जे, नितीन थाडे, डॉ. सुधा कांकरिया, शुभश्री पटनाईक, चंदन शहा, शुभा खंडेलवाल, संदीप कुसळकर, अमर गुरप, पुरुषोत्तम जाधव, चंद्रशेखर मुळे, नितीन पाठक, निलेश वैकर, आश्लेषा भांडारकर आदींनी नियोजन केले.


कौटुंबिक न्यायालय अहिल्यानगर येथे राष्ट्रीय लोक अदालतीचे उदघाटन न्यायाधीश संगीता भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले.

# लोक अदालत काळाची गरज : न्यायाधीश संगीता भालेराव

नगर – लोक अदालतीद्वारे वाद मिटविणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर येथील कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती संगीता भालेराव यांनी केले.

कौटुंबिक न्यायालय अहिल्यानगर येथे राष्ट्रीय लोक अदालतीचे उदघाटन प्रसंगी न्यायाधीश संगीता भालेराव यांनी केले. याप्रसंगी लोक अदालतीचे पॅनल प्रमुख पी. टी. शेजवळ काळे मॅडम, ॲड. शिवाजीराव कराळे, कामगार न्यायालयाचे न्यायाधीश आर. एन. गायकवाड, कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष ॲड. सुरेश लगड, कार्याध्यक्ष ॲड. शिवाजी सांगळे, सचिव ॲड. राजेश कावरे, ॲड. सुरेश भोर आदी उपस्थित होते.

सदर राष्ट्रीय लोक अदालतीमधे कामगार न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, औद्योगीक न्यायालय, सहकार न्यायालय येथील एकूण १६६ खटले ठेवलेले होते. यापैकी ११ खटले निकाली निघून ७२ लाख ६० हजार ९८७ रुपये संबंधितांना मंजूर झाले.

यावेळी कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक नितीन धोंडगे, सहा. अधिक्षक आसीफ शेख, कर्मचारी श्रीमती एस. एस. चव्हाण, धीरज नारखेडे, रोहीत गुंडु, श्रीमती एस. एल. जाधव, पोलीस कर्मचारी एन. एम. कांबळे, महीला पोलीस आर. पी. चोपडे. पोलीस कर्मचारी आरडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. लक्ष्मण कचरे यांनी केले. सुत्रसंचालन ॲड. राजेश कावरे यांनी केले तर आभार प्रदर्शन ॲड. सुरेश भोर यांनी केले.

# सब–ज्युनिअर राष्ट्रीय कुराश स्पर्धेत अहिल्यानगर येथील सिद्धी दातरंगे हिने महाराष्ट्राला मिळवून दिले ब्रॉंझ मेडल

नगर – नुकत्याच रायपुर छत्तीसगड या ठिकाणी सब–ज्युनिअर राष्ट्रीय कुराश स्पर्धेमध्ये सिद्धी दातरंगे हिने ५२ किलो वजनी गटात महाराष्ट्रा कडून नेतृत्व केले. त्यामधे तीने ब्रॉंझ मेडल पटकावले. सिद्धी ही अहिल्यानगर शहराची खेळाडु आहे. मागच्या वर्षी देखील तिने राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदवला होता


सब–ज्युनिअर राष्ट्रीय कुराश स्पर्धेत सिद्धी दातरंगे हिने महाराष्ट्राला ब्रॉंझ मेडल मिळविले. याप्रसंगी महाराष्ट्र कुराश असोसिएशनचे अध्यक्ष अंकुश नागर उपस्थित होते.

सिद्धीचे वडील अशोक दातरंगे हे मनसे वाहतूक सेना शहर जिल्हाध्यक्ष आहे. सिद्धी ही भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल मध्ये इयत्ता आठवीला मध्ये शिकत असून ती यंग मेन्स जुडो व कुराश क्लब सिद्धी बागची खेळाडू आहे. तिला प्रा. संजय धोपावकर, आदित्य धोपावकर, कैलास करपे, सुनील गायकवाड, पै.गणेश लांडगे, विनीत बुरला, फायाज सय्यद, सोनाली साबळे, पै.शुभम दातरंगे, वस्ताद जयंत (लहानु) शिंदे, पै.गोरख खंडागळे, अथर्व नरसाळे, पियुष शिंगारे यांचे मार्गदर्शन लाभले.


जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बार असोसिएशन आणि सेंट्रल बार असोशिएशन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजिलेल्या राष्ट्रीय लोक न्यायालयाचे उद्घाटन ज्येष्ठ पक्षकारांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून करण्यात आले. त्याप्रसंगी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे आदी.

# संबंध टिकविण्यासाठी वाद समेटाने मिटविण्याची गरज

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांचे प्रतिपादन; राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन

नगर – वादापेक्षा मनाची शांतता महत्वाची आहे. समाजात शांतता प्रस्तापित करणे व नाते संबंध टिकविण्यासाठी वाद समेटाने मिटविणे काळाची गरज आहे. त्यामुळे आपली प्रकरणे सामंजस्याने मिटवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बार असोशिएशन आणि सेंट्रल बार असोशिएशन यांचे संयुक्त विद्यमाने १३ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक न्यायालयाचे आयोजन जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर तसेच सर्व तालुका न्यायालयांमध्ये करण्यात आले होते. राष्ट्रीय लोकन्यायालयाचे उद्घाटन ज्येष्ठ पक्षकारांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून करण्यात आले. त्याप्रसंगी न्यायाधीश अंजू शेंडे अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

यावेळी जिल्हा न्यायाधीश ए. एम. पाटील, जिल्हा न्यायाधीश सी. एम. बागल, जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, बार असोशिएशन अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे, सेन्ट्रल बार असोशिएशन अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी, पोलिस निरीक्षक जगदीश भांबळ आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

दिवाणी तथा वरिष्ठ स्तर न्यायाधीश वाय. एस.पैठणकर यांनी प्रास्ताविक केले. दिवाणी न्यायाधीश आर.आर. रहातेकर यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. के. एम. सोनवणे यांनी आभार मानले.

याप्रसंगी न्यायिक अधिकारी, वकील संघटनेचे पदाधिकारी, सदस्य आणि पक्षकार उपस्थित होते.

# अपघाती मृत्यू प्रकरणी वारसांना एक कोटींची भरपाई

नगर – कुटुंबप्रमुखाच्या अपघाती मृत्यूबद्दल वारसांना एक कोटी रुपयांची नुकसानभरपाई राष्ट्रीय लोकन्यायालयामध्ये मंजूर करण्यात आली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते वारसांना धनादेश प्रदान करण्यात आला.


कुटुंबप्रमुखाच्या अपघाती मृत्यूबद्दल वारसांना एक कोटी रुपयांची नुकसानभरपाई राष्ट्रीय लोकन्यायालयामध्ये मंजूर करण्यात आली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते वारसांना धनादेश प्रदान करण्यात आला.

करंजी (ता. पाथर्डी) येथील रहिवासी अनिल शिवाजी भाकरे (वय ३६) हे टाकळी काझी (ता. नगर) येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते.नगर–पाथर्डी रस्त्यावर ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी हॉटेल सिद्धीविनायक येथे झालेल्या दुर्दैवी अपघातात त्यांचा मृत्यू झाला होता. मयत अनिल भाकरे यांच्या पश्चात पत्नी, वयोवृद्ध आई–वडील व दोन लहान मुले असा परिवार उरला आहे.

अनिल भाकरे यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबाने ॲड. मधुकर कोरडे यांच्या मार्फत येथील मोटार अपघात न्यायाधिकरणासमोर नुकसानभरपाईसाठी दावा दाखल केला होता. हा दावा चोलामंडलम एमएस जनरल विमा कंपनीविरुद्ध दाखल करण्यात आला होता.

सदर प्रकरणात विमा कंपनीतर्फे ॲड. गिरीजा गांधी यांनी बचाव दाखल केला. या दुर्दैवी अपघातातील मयताच्या वारसांना जलद व योग्य नुकसानभरपाई मिळावी यासाठी अर्जदार व कंपनीच्या वकिलांनी प्रयत्न केले. अहिल्यानगर जिल्हा न्यायालयात आयोजित राष्ट्रीय लोकन्यायालयामध्ये अर्जदार व विमा कंपनीचे मॅनेजर विशाल गुप्ता व श्रद्धा पूर्णपात्रे यांनी वकिलांच्या समवेत चर्चा करून समन्वय साधला. या अपघातातील मयताच्या वारसांना लोकन्यायालयामध्ये एक कोटी रुपयांची भरपाई देण्याचे मान्य करण्यात आले व तसा धनादेश देण्यात आला.

जिल्हा न्यायाधीश के. एस. कुलकर्णी व ॲड. भूषण बहाटे यांच्या पॅनेलसमोर हे प्रकरण समोपचाराने निकाली काढण्यात आले. ॲड. सिद्धांत गांधी व ॲड. आरती सरोदे यांनी सहाय्य केले.

# अहिल्यानगर येथील पैं. विराट करंजुले यास राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण पदक



नगर – १० ते १३ सप्टेंबर रोजी रायपुर, छत्तीसगढ येथे यंग मेन्स 'ज्युडो क्लबचे विद्यार्थी पै. विराट युवराज करंजुले याने रायपुर येथे झालेल्या राष्ट्रीय कुराश २०२५–२६ चॅम्पीयनशिप स्पर्धेत सुवर्णपदकाची कामगीरी केली. मागील वर्षीही दोन्ही बंधुंनी सुवर्ण पदकाची कामगीरी केली होती. विराटने आपल्या जिद्द कठोर सराव आणि कौशल्याच्या जोरावर राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला व सर्वांचे लक्ष वेधुन घेतले. थरारक विजय इयत्ता पाचवीमध्ये शिकणाऱ्या ४५ किलो वजन गटात त्याने दिल्ली, हरियाणा, पंजाबच्या मल्लांना आस्मान दाखवले. सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेत अखंड वेग अचूक दावाच्या मालिकेने त्याने प्रतिस्पर्धीला कोणतीही संधी दिली नाही त्याचा प्रत्येक सामना प्रेक्षकांच्या उत्साहवर्धक जयघोषात हे सामने रंगले.

राष्ट्रीय पातळीवर हा विजय म्हणजे विराटच्या प्रवासाची केवळ सुरुवात आहे. त्याचे आंतरराष्ट्रीय स्पर्धेकडे लक्ष असून पुढे असेच कौशल्य दाखवण्याचे त्याने निश्चिय केले आहे.

विराटचे वडिल युवराज करंजुले हेही राष्ट्रीय खेळाडू आहेत. विराटला बालपणापासूनच वडिलांच्या मार्गदर्शनाखाली दैनंदिन व्यायाम सराव करत आहे. आपले कौशल्य विकसित केले आहे. त्याच्या सुवर्ण कामगीरीमध्ये मोलाचा वाटा त्याचे कोच संजय धोपावकर, आदित्य धोपावकर, शिभम दातरंगे, गणेश शिंदे, अथर्व नरसाळे, यश, पियुश, पै. माया गायकवाड यांचे देखील मार्गदर्शन लाभले.

# पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांना 'आज का कर्मवीर' पुरस्कार

नगर – रामनगर (उत्तराखंड) येथे आखिल भारतीय अखंड राजपूताना राष्ट्रीय सेवा संघतर्फे आयोजित राष्ट्रीय बिझनेस समिट व सन्मान सोहळा पार पडला. यावेळी पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांना 'आज का कर्मवीर' पुरस्काराने गौरविण्यात आले.



रामनगर (उत्तराखंड) येथे आखिल भारतीय अखंड राजपूताना राष्ट्रीय सेवा संघतर्फे आयोजित राष्ट्रीय बिझनेस समिट व सन्मान सोहळा पार पडला. यावेळी पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांना 'आज का कर्मवीर' पुरस्काराने गौरविण्यात आले.

या सोहळ्यास अखिल भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह, बिहारचे पर्यटन मंत्री डॉ. राजेशकुमार सिंह, महाराष्ट्राचे पर्यटन मंत्री जयकुमार रावल, शौर्य शिरोमणी महाराणा प्रताप यांचे वंशज महाराणा डॉ. लक्षराज सिंह मेवाड, कर्मवीर पुरस्कार फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. आर.पी. सिंह सदर कार्यक्रमाला महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोशियारी आदी उपस्थित होते. उत्तराखंड चे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, माजी मुख्यमंत्री तथा उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ तसेच राजपूत क्षेत्रातील क्षत्रियांनी महानुभवांनी यासाठी विशेष संदेश दिले होते.

छत्रपती शिवाजी महाराज व महाराणा प्रताप यांच्या प्रेरणेतून या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे. कार्यक्रमाची सुरुवातही महाराजांचा जयघोष करून करण्यात आली. दरवर्षी भारतातील एका राज्यात औद्योगिक परिषदेचे आयोजन करून राजकीय, प्रशासकीय, सामाजीक, औद्योगिक क्षेत्रात राष्ट्र उभारणीसाठी योगदान देणाऱ्या विशेष व्यक्तींना हा सन्मान दिला जातो.

यंदा देशभरातील नामवंत व्यक्तींना हा पुरस्कार मिळाला. त्यात महाराष्ट्रातून डॉ. पोपटराव पवार, पद्मश्री कवलसिंह चौहान हरियाणा, पद्मश्री भीमसिंग बिहार, माजी पोलीस महासंचालक डॉ. विक्रम सिंह, आयपीएस संदीप सिंह चौहान, जितेंद्रसिंह शेखावत यांचा समावेश होता.

मनोगत व्यक्त करताना पद्मश्री पोपटराव पवार यांनी हिवरे बाजारचा अनुभव व विविध शासकीय योजना प्रभावीपणे कशा राबविण्यात यावेत तसेच हिवरे बाजारमधील मृद व जलसंधारण, पाण्याचा ताळेबंद, ग्रामविकासात लोकसहभागाचे महत्त्व व ग्रामविकासाची सप्तसूत्री यांचा विशेष उल्लेख केला. त्यांच्या अनुभवातून प्रेरणा घेत उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी आपला अभ्यासगट लवकरच हिवरे बाजारला पाठवण्याची घोषणा केली.

# अहिल्यानगरमध्ये १७ सप्टेंबर रोजी मेगा ब्लड डोनेशन कॅम्पचे आयोजन

नगर – युगप्रधान आचार्यश्री महाश्रमणजी यांच्या आशीर्वादाने व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर रोजी मेगा ब्लड डोनेशन कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. यादिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत आनंदऋषीजी ब्लड बँक सेंटर, प्रेमदान चौक येथील हेल्पिंग हॅण्डस फॉर हंगर्स ग्रुप आणि नालेगाव जनकल्याण रक्तदान पेढी या तीन ठिकाणी रक्तदान शिबीर होणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मध्य रेल्वे सल्लागार समिती (रेल मंत्रालय) तथा भाजप जैन प्रकोष्ठचे प्रदेश सचिव सुदर्शन डुंगरवाल व श्री जैन श्वेतांबर तेरापंथी उपसभा, अहिल्यानगरचे प्रकाश बच्छावत यांनी सांगितले.



रक्तदान हे माणुसकी धर्म जपणारे महान व पवित्र कार्य आहे. या कार्यात सहभागी होऊन नवीन जीवनदान देण्याच्या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन सुदर्शन डूंगरवाल यांनी केले आहे. भारतीय जनता पक्ष अहिल्यानगर शहर जिल्हा, भाजप व्यापारी आघाडी, भाजप शहर मंडल, भाजप जैन प्रकोष्ठ सेलसह अहिल्यानगर येथील विविध संस्थांनी या रक्तदान अमृतमहोत्सव २.० चे नियोजन केले आहे.



१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत भाजपाच्या सावेडी मंडलाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी आयोजिलेल्या बैठकीचा दीपप्रज्वलन करुन शुभारंभ करताना शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते आदी.

# सेवा पंधरवड्यानिमित्त भाजपा सावेडी मंडलाच्यावतीने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान विविध कार्यक्रम

नगर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७५ वा वाढदिवस सेवा पंधरवडा म्हणून साजरा होत आहे. यानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर या कालावधीत भारतीय जनता पार्टीच्या वतीने प्रदेशस्तर, जिल्हा स्तर तसेच मंडल स्तरावर विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१७ सप्टेंबर रोजी जिल्हास्तरावर जैन युवा सोशल फोरम यांच्यासोबत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच नमो मॅरेथॉन या स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. तसेच शहरात विविध ठिकाणी स्वच्छता अभियान, दिव्यांगांचा सन्मान अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले आहे.

यानिमित्त सावेडी मंडलाची नियोजन बैठक पार पडली. याप्रसंगी उपाध्यक्ष बाबासाहेब सानप, महिला अध्यक्ष प्रियाताई जानवे, ज्योती दांडगे, सावेडी मंडलाचे अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे, सरचिटणीस निखिल वारे, माजी नगरसेवक रवींद्र बारस्कर, मनोज दूलम, मनोज ताठे, पुष्कर कुलकर्णी, संपत नलावडे, संगीता खरमाळे, अशोक गायकवाड, अनिल ढवण, बाळासाहेब गायकवाड, महेश नामदे, गोपाल वर्मा, राजेंद्र मंगलारम, हेमंत पवार, ऋदेश अंबाडे, सौ.प्रज्ञा जोशी, सौ.प्रतिक्षा रसाळ, सौ.रेणुका करंदीकर, सौ.वंदना पंडित, सुरज मोहिते, आकाश सोनवणे, वैभव झोटिंग, अनिरुद्ध घेसास आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात सीए ज्ञानेश्वर काळे यांनी केले. सेवा पंधरवडायामध्ये स्वच्छता मोहीम, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, एक पेड मा के नाम वृक्षारोपण कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सेवा पंधरवडा प्रत्येकाने आपल्या घरी दिवाळी प्रमाणे रांगोळी काढून, आकर्षक विद्युत रोषणाई व मिठाईचे वाटप करून साजरा करावा, असे आवाहन बाबासाहेब सानप यांनी केले.

सूत्रसंचालन रेणुका करंदीकर यांनी केले. प्रियाताई जानवे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमासाठी सावेडी मंडलाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान महसूल विभाग राबविणार 'सेवा पंधरवाडा' अभियान

नगर – महसूल व वन विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवाडा' हे विशेष अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राज्यभर राबविण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त व महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महसूल विभागाच्या सेवा अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि पारदर्शक बनवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानांतर्गत विविध उपक्रम युद्धपातळीवर राबवले जाणार आहेत, जेणेकरून सामान्य जनतेच्या दैनंदिन समस्यांचे निराकरण होईल. या 'सेवा पंधरवाडा' अभियानाची अंमलबजावणी तीन टप्प्यांत केली जाणार आहे :

पहिला टप्पा : पाणंद रस्ते विषयक मोहीम (१७ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर) – या कालावधीत पाणंद / शिवार रस्त्यांना क्रमांक देणे, त्यांचे सर्वेक्षण करणे, गावाच्या नकाशावर चिन्हांकित करणे आणि निस्तार पत्रकात नोंद नसलेल्या रस्त्यांची नोंद करणे यावर लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच, शेतावर जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी संमतीपत्रे घेणे आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी 'रस्ता अदालत' आयोजित केली जाईल.

दुसरा टप्पा : 'सर्वांसाठी घरे' उपक्रम (२३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर)– या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमासाठी पूरक कार्यवाही केली जाईल. यामध्ये घरे बांधण्यासाठी उपलब्ध असलेली शासकीय जमीन कब्जेहक्काने देणे, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुसार नियमित करणे आणि अतिक्रमण नियमित केलेल्या तसेच जमीन वाटप झालेल्या लाभार्थ्यांना जमिनीचे पट्टे वाटप करणे या बाबींवर भर दिला जाईल.

तिसरा टप्पा : नावीन्यपूर्ण उपक्रम (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर) – या अंतिम टप्प्यात जिल्हाधिकारी स्थानिक परिस्थिती व गरजा लक्षात घेऊन नावीन्यपूर्ण उपक्रम राबवतील. या अभियानात स्थानिक लोकप्रतिनिधी जसे की विधानसभा/ विधान परिषद सदस्य, संसद सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि ग्रामपंचायत सदस्यांना सहभागी करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान केला जाणार आहे.

उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी या अभियानासाठी नियोजन करून, ते यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत, अशा सूचना शासन निर्णयात देण्यात आल्या आहेत.

# स्वच्छता ही सेवा अभियान ग्रामपंचायतीने प्रभावीपणे राबवावी

## मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचे आवाहन; अभियान कालावधी : १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर

नगर – स्वच्छ भारत मिशन अंतर्गत महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानुसार दरवर्षीप्रमाणे स्वच्छता ही सेवा (SHS) मोहीम १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत ग्रामपंचायतींनी प्रभावीपणे राबवावी, असे आवाहन जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले आहे.

या वर्षीच्या स्वच्छता ही सेवा २०२५ साठी स्वच्छोत्सव ही थीम निश्चित केली असून खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात येणार आहेत –

१७ सप्टेंबर रोजी मोहिमेचा शुभारंभ तालुका व गाव पातळीवर परिसर स्वच्छतेच्या उपक्रमाने होणार आहे.

स्वच्छता लक्ष युनिट (CTUs) - अस्वच्छ ठिकाणांची निवड करून मॅपिंग व साफसफाई करण्यात येईल., सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता – संस्था, प्रतिष्ठान व गर्दीच्या ठिकाणांची स्वच्छता करण्यात येईल., सफाईमित्र सुरक्षा शिबिरे – सफाईमित्रांसाठी एक खिडकी योजना राबवली जाईल. आरोग्य कॅम्पद्वारे त्यांची तपासणी होईल. तालुका पातळीवर डिग्निटी कॅम्प घेऊन वैयक्तिक लाभाच्या शासकीय योजनांचा लाभ सफाईमित्रांना दिला जाईल., क्लीन ग्रीन उत्सव – पर्यावरणपूरक व शून्य कचरा उत्सव साजरा केला जाईल., प्रबोधनपर उपक्रम – स्वच्छ सुजल गाव, कचऱ्यापासून कलाकृती, स्वच्छ स्ट्रीट फूड केंद्र आदी., एक दिवस – एक घंटा – एक सोबत : २५ सप्टेंबर रोजी देशव्यापी श्रमदान होणार असून जिल्ह्यातील सर्व घटकांचा सहभाग राहील., हागणदारीमुक्त अधिक मॉडेल गाव व स्वच्छ सुजल गाव विशेष ग्रामसभेत घोषित करता येतील. या विशेष ग्रामसभा १७ सप्टेंबर रोजी होणार आहेत.

स्वच्छता ही सेवा २०२५ मधील सर्व उपक्रम केंद्र शासनाच्या आयटी पोर्टलवर (https://swachhatahiseva.gov.in/) अपलोड केले जाणार असून त्याद्वारे शासनस्तरावर नियंत्रण ठेवले जाईल.

या सर्व उपक्रमात ग्रामस्थांनी सहभागी होऊन अभियान यशस्वी करावे, असे आवाहन जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक राजेंद्र देसले यांनी केले आहे.

# समाजसेवक अविनाश देडगावकर यांचा गौरव

नगर – गेल्या ४६ वर्षापासून ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता समाजसेवक अविनाश देऊळगावकर यांनी केलेल्या समाजसेवेची दखल घेऊन त्यांच्या ५७ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून बागडपट्टी येथील संतोष वन्नम मित्र मंडळाच्या तर्फे अविनाश देडगावकर यांचा गौरव करण्यात आला. यावेळी सिद्धी गणेश ऑफसेट चे संचालक मनीष झंवर यांच्या हस्ते अविनाश देडगावकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी यशवंत कॉम्प्युटर्सचे संतोष वन्नम, सुशांत वन्नम, समर्थ घोडके, प्रकाश ट्रॉफीजचे प्रकाश बल्लाळ, लोटके आर्ट्सचे विनायक लोटके आणि योगेश सोमानी आदी उपस्थित होते.



समाजसेवक अविनाश देडगावकर यांच्या ५७ व्या वाढदिवसानिमित्त बागडपट्टी परिसरातील संतोष वन्नम मित्र मंडळाच्या तर्फे अविनाश देडगावकर यांचा गणेश ऑफसेट चे संचालक मनीष झंवर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अविनाश देडगावकर यांच्या रूपाने अहिल्यानगर येथे अंकुरत असलेल्या समाजसेवेची ओळख सर्वसामान्यांना होणे गरजेचे आहे अशी भावनाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

अविनाश देडगावकर यांना लहानपणापासूनच समाजकार्याची ओढ होती. त्यांच्या शालेय जीवनात त्यांचा एक मित्र आजारी पडला असताना अविनाशजी यांच्या मदतीमुळे तो आजारातून बरा झाला. त्यावेळी अविनाश यांचा आभार मानताना त्या मित्राच्या आई–वडिलांचे कृतज्ञतेचे अश्रू त्यांनी पाहिले. आजारी व्यक्तींना मदत करणे समाधान देणारे असल्याचे देडगावकरांच्या लक्षात आले. तेथूनच त्यांच्या रुग्णसेवेची आणि समाजसेवेची सुरुवात झाली. कित्येक रुग्णांची मनोभावे सुश्रुषा आणि वैद्यकीय सेवा त्यांच्याकडून झाली. रुग्णाजवळ औषध पाणी देण्यासाठी कोणी नसते अशा वेळी अविनाश देडगावकर धावून जातात, प्रसंगी स्वतःच्या दुचाकी वरून रुग्णांना दवाखान्यात पोहोचवतात त्यांच्या नातेवाईकांना कळवतात. अनेकदा रुग्णाची देखभालही करतात औषधे, जेवण आणून देण्याचे कामही करतात. देडगावकर यांच्या या कामामुळे अनेक संघटनांनी त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांचा सत्कार केला आहे. पुणे येथील एका संस्थेने त्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव केला. तर महावीरनगर येथे जनतेच्या वतीनेही त्यांना सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

गणेशोत्सव, मोहरम नवरात्र या धार्मिक उत्सवांमध्ये वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून देडगावकर पोलिसांनाही मदत करतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन २०११ साली कृष्णप्रकाश यांच्या शिफारसीनुसार त्यांना पोलीस मित्र असा किताबही देण्यात आला. अविनाश देडगावकर हे तरुणांसाठी आदर्श आहेत. आपल्या समाजाला अशा समाजसेवकांची गरज आहे, असे मत संतोष वन्नम यांनी व्यक्त केले.



नगर येथील सिद्धीबाग जलतरण तलावावर ऑलम्पिकवीर वीरधवल खाडे यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये अहिल्यानगर येथील जलतरणपटूंनी सहभाग घेतला होता.

# नगर येथील सिद्धीबाग जलतरण तलावावर ऑलम्पिकवीर वीरधवल खाडे यांची कार्यशाळा

नगर – सिद्धीबाग अर्थात स्व. धर्मवीर अनिल भैय्या राठोड जलतरण तलाव येथे जलतरणपटू व ऑलम्पिकवीर वीरधवल खाडे यांची कार्यशाळा कुलकर्णीज् स्विम ॲण्ड रिसर्च अकॅडमी संस्थेतर्फे आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये अहिल्यानगर येथील जलतरणपटूंनी सहभाग घेतला होता.

या कार्यशाळेमध्ये विविध उपक्रम राबवले गेले. प्रामुख्याने विद्यार्थ्यांची दिनचर्या कशी असावी, त्यांचा आहार आणि पोषण कसे असावे, मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून जलतरण स्पर्धेची कशी तयारी करावी, जलतरणपटूंसाठी खास तयार केलेले व्यायाम कसे करावे, स्पर्धेच्या दिवशी आणि स्पर्धेच्या अगोदर दिनचर्या कशी असावी व मानसिकता कशी असावी यावर भर दिला गेला.

वीरधवल खाडे यांनी त्यांच्या जीवनामध्ये मोठे यश प्राप्त केलेले असून ते जलतरण क्षेत्रामध्ये एकमेवाद्वितीय असे व्यक्तिमत्व असून ऑलम्पिक–मध्ये सहभागी होण्याचा मान त्यांना मिळालेला आहे. अहिल्यानगर शहरातील जलतरणपटू आणि कुलकर्णीज स्विम अँड रिसर्च अकॅडमी या केवळ जलतरणास वाहून घेतलेल्या संस्थेचे त्यांनी कौतुक करून भविष्यामध्ये या विद्यार्थ्यांना पुन्हा मार्गदर्शन करण्याचे आश्वासन वीरधवल खाडे यांनी दिले. यशस्वी खेळाडूंचा सत्कार करून त्यांना पुढील भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा त्यांनी दिल्या.





आनंदऋषी हॉस्पिटल ते सक्कर चौक परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. (छाया – लहू दळवी)

# महानगरपालिकेच्या स्वच्छता पंधरवडा अभियानाचा शुभारंभ; आनंदऋषी हॉस्पिटल ते सक्कर चौक परिसरात स्वच्छता मोहीम

नगर – स्वच्छता ही सेवा प्रत्येकाची जबाबदारी, अहिल्यानगरची प्रगती! असा संदेश देत अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता पंधरवडा अभियानाला रविवारी सुरुवात करण्यात आली. १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता पंधरवडा अभियानाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. आनंदऋषी हॉस्पिटल ते सक्कर चौक रस्त्यावरील कचरा, हरित कचरा, प्लॅस्टिक कचरा उचलून परिसर स्वच्छ करण्यात आला.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून आनंदऋषी हॉस्पिटल ते सक्कर चौक परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शहरातील कचरा समस्या कायमस्वरूपी मार्गी लागण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया सुरू आहे. महिनाअखेरीपर्यंत हा प्रश्न मार्गी लागणार आहे. याच दरम्यान, स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून महानगरपालिकेने मोहीम हाती घेतली आहे. स्वच्छता ही सेवा अन् प्रत्येकाची जबाबदारीही आहे. स्वच्छतेच्या या पंधरवड्यात सहभागी होऊन आपणही स्वच्छ अहिल्यानगर, सुंदर अहिल्यानगर घडवण्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन यशवंत डांगे यांनी केले.

दरम्यान, अहिल्यानगर महानगरपालिका स्वच्छ सर्वेक्षण व माजी वसुंधरा अभियान अंतर्गत सावेडी परिसरात सायकल तसेच पायी रॅलीद्वारे स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. हरियाली, स्वच्छता रक्षक समिती, रोटरी क्लब, अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशन, युवान, शासकीय तंत्रनिकेतन आदी संस्थांचे प्रतिनिधी यात सहभागी झाले होते.

रॅलीमध्ये सहभागी झालेल्यांनी स्वच्छ अहिल्यानगर – आपली जबाबदारी या प्रतिज्ञेसह स्वच्छतेचा संकल्प केला.

# मोहम्मद पैगंबर हे संपूर्ण मानवजातीसाठी दया, प्रेम आणि सत्याचा संदेश घेऊन आले

## नौशाद सय्यद यांचे प्रतिपादन; ईद–ए–मिलादुन्नबी निमित्त सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत सिरतुंन्नबी वक्तृत्व स्पर्धा

नगर – हजरत मोहम्मद पैगंबर हे संपूर्ण मानवजातीसाठी दया प्रेम आणि सत्याचा संदेश घेऊन आले. त्यांनी शिकवले की श्रीमंत असो वा गरीब, मोठा असो वा लहान सर्व मानव समान आहेत. त्यांच्या जीवनातील प्रत्येक प्रसंग आपल्याला संयम, प्रामाणिकपणा आणि परस्परांबद्दल दया ठेवण्याची शिकवण देतो. आजच्या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनींनी या महान शिकवणीचे स्मरण करून दिले, हीच खरी ईद–ए–मिलादुन्नबी साजरी करण्याची पद्धत आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेचे मुख्याध्यापक सय्यद नौशाद यांनी केले.



ईद–ए–मिलादुन्नबीच्या निमित्ताने मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीच्या सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेमध्ये सिरतूंन्नबी वक्तृत्व स्पर्धेच्या कार्यक्रमामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान आदी.

ईद–ए–मिलादुन्नबीच्या निमित्ताने मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीच्या सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेमध्ये सिरतूंन्नबी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, शबाना बाजी, मुख्याध्यापक सय्यद नौशाद, शिक्षक शेख फरजाना दिलावर, शेख अस्लम पटेल, शेख शाहिन, शेख हिना, पठाण फरहान उज़मा, शेख यास्मीन व शेख सुलताना आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात तब्बल ५० विद्यार्थिनींनी पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग आपल्या वक्तृत्वातून मांडले. काही विद्यार्थिनींनी मधुर आवाजात नाअत–ए–पाक सादर करून भारावून टाकले.

याप्रसंगी मिठाई व बक्षिसांचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक असलम पटेल यांनी केले. सूत्रसंचालन सुलताना शेख यांनी केले शेख शाहीन यांनी आभार मानले.

# पाणीटंचाईने त्रस्त नागरिकांनी भरपावसातही केले 'आंदोलन'

## नवनागापूर ग्रामपंचायत सरपंचाच्या दंडेल व मुघलशाहीमुळे पाणी योजना पूर्ण झाली नाही : माजी सरपंच आप्पासाहेब सप्रे

नगर – नवनागपूर ग्रामपंचायत ही नगर एमआयडीसी हद्दीमध्ये असून या ठिकाणी नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्य करत आहे नव नागपूरचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सुटावा यासाठी मी सरपंच असताना जलजीवन पाणी योजना मंजूर करून ९ कोटी ८१ लाख रुपयाचा निधी मिळवून दिला, २०२१ ला कार्यारंभ आदेश निघून कामाला सुरुवात झाली टाक्यांची उभारणी झाली, गेल्या ५ वर्षांमध्ये सरपंचांनी या योजनेकडे दुर्लक्ष करत साधा पाठपुरावा देखील केला नाही, सरपंचाच्या दंडेल व मुघलशाहीमुळे पाणी प्रश्न मार्गी लागला नाही, नागरिकांना १० ते १२ दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे त्यामुळे नागरिक त्रस्त झाली आहे सरपंचाची स्वतःची पाणी योजना चालू असून त्यांना या माध्यमातून आर्थिक लाभ मिळत आहे लोकांच्या भावनेशी ते खेळत आहेत जलजीवन योजनेचे सचिव व सरपंच तेच असून अजून पर्यंत ही योजना पूर्ण का झाली नाही सनसुदीचे दिवस सुरू असून दसऱ्यापर्यंत योजना सुरु न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल असा इशारा नवनागापूरचे माजी सरपंच आप्पासाहेब सप्रे यांनी दिला



माजी सरपंच आप्पासाहेब सप्रे यांच्या नेतृत्वाखाली पावसामध्ये आंदोलन करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

नवनागपूर ग्रामपंचायतची जलजीवन पाणी योजना तातडीने पूर्ण करावी या मागणीसाठी आप्पासाहेब सप्रे यांच्या नेतृत्वाखाली भर पावसात नागरिक व महिलांनी तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले. यावेळी आप्पासाहेब सप्रे, ग्रामपंचायत सदस्य संजय भोर, सागर सप्रे, नरेश शेळके, सचिन घोडके, संतोष रोकडे, हर्षल चौधरी, गणेश चव्हाण, राम अडसुरे, रेणुका पुंड, शारदा शिंदे, मीना बेल्हेकर, आशा क्षिरसागर, शोभा जगताप, नलिनी क्षीरसागर, भाग्यश्री वाघ, कविता नाईक, मनीषा भापकर, शितल तापकिर, मंदा गुंड, छाया पठारे आदींसह नागरिक उपस्थित होते

आंदोलनकर्त्यांनी जलजीवनचे अधिकारी संजय रुमाले यांना धारेवर धरत सांगितले की गेल्या दहा वर्षापासून आम्ही पाणीटंचाईला सामोरे जातो, दहा ते बारा दिवस पाणी सुटत नाही, साठवून ठेवलेल्या पाण्यामध्ये अळ्या होतात, साथीचे आजार पसरतात, पाहुणे आले की आम्हाला चहा करायला देखील पाणी राहत नाही, सरपंचाच्या रोजी रोटी साठी नागरिकांना वेठीस धरले जाते, दसऱ्याच्या दिवशी आम्हाला आपट्याचे सोने देऊ नका, मात्र पाणी द्या अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल असा इशारा नागरिकांनी दिला

पाणी देणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे या जलजीवन पाणी योजनेमध्ये राजकारण केले जात आहे, अप्पासाहेब सप्रे यांच्या सहकार्यातून ही योजना मार्गी लागत असताना प्रशासनाला विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे, जिल्हाधिकारी यांनी १७ सप्टेंबर रोजी नगर तालुक्यातील जलजीवन पाणी योजने संदर्भात बैठकीचे आयोजन केले असून नव नागपूर गावचा प्रश्न या ठिकाणी मांडला जाईल व पर्याय काढत या गावचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले जाईल असे आश्वासन जलजीवन मिशन योजनेचे अधिकारी संजय रुमाले यांनी दिले

नवनागपूरचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सुटून नागरिकांना दररोज पूर्ण दाबाने पाणीपुरवठा व्हावा यासाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला मात्र या कामांमध्ये गावचे सरपंच आडकाठी आणत असल्यामुळे ही योजना पूर्ण होऊ शकली नाही त्यामुळे नागरिकांना विविध प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे या योजनेमध्ये आर्थिक हितसंबंध असल्यामुळे ही योजना पूर्ण होऊ नये यासाठी प्रयत्न केला जातो भर पावसात नागरिक महिला एवढ्या मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलन करतात तरी प्रशासनाने तातडीने उपयोजना करून पाणी प्रश्न मार्गी लावावा असे मत माजी सरपंच आप्पासाहेब सप्रे यांनी व्यक्त केले.

# डीएसपी चौकात कंटेनरने दिली सात वाहनांना धडक

नगर – भरधाव कंटेनरने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या सात वाहनांना जोरदार धडक दिल्याने शिक्षक जखमी झाले असून वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची घटना शहरातील डी. एस. पी. चौकात १३ सप्टेंबर रोजी रात्री १०.३० च्या सुमारास घडली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात कंटेनर चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जखमी शिक्षक सागर दिनकर चिकने (वय ३१, रा. स्टेट बँक कॉलनी, तहसील कार्यालयाच्या पाठीमागे, शिरूर, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. जगप्रित कश्मिर सिंह (रा. व्ही. पी. ओ. चौधरीवाल, बाटाला, गुरदासपुर, पंजाब) असे गुन्हा दाखल झालेल्या कंटेनर चालकाचे नाव आहे. डी. एस. पी. चौकातील पंचवटी हॉटेलसमोर ही दुर्घटना घडली. फिर्यादी आपल्या मारुती कंपनीच्या सेलेरिओ (क्र.एमएच १२ एक्सएच ९६३८) या कारमधून जात होते. यावेळी समोरून भरधाव वेगाने आलेल्या कंटेनरने (क्र.एचआर ५५ एएल ८७०४) रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून फिर्यादीच्या कारला समोरून जोरदार धडक दिली. या धडकेत फिर्यादी जखमी झाले. तसेच, पंचवटी हॉटेलच्या समोर उभ्या असलेल्या इतर सहा वाहनांना या कंटेनरची धडक बसून त्यांचे मोठे नुकसान झाले. इतर काही चारचाकी वाहनांचेही किरकोळ नुकसान झाले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. दरम्यान, घटनास्थळी नागरिकांनी गर्दी केली होती. पाऊस सुरू असल्याने वाहतूक कोंडी झाली होती. माहिती मिळताच भिंगार कॅम्पचे सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. यासंदर्भात रविवारी पहाटे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस अंमलदार इस्त्राईल पठाण करीत आहेत.

# पोलीस उपअधीक्षक अमोल भारतींविरोधात महासंचालकांकडे तक्रार

## खासदार निलेश लंके यांची तात्काळ कारवाईची मागणी

नगर – जिल्ह्यातील लोणी पोलीस ठाणे आणि शिर्डी विभागातील पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या वर्तनाविरोधात गंभीर आरोप होत असून खासदार नीलेश लंके यांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांना निवेदन देत जनतेवरील पोलिसी दहशत थांबविण्याची मागणी केली आहे. कोल्हार गावातील उद्योजक कैलास पिलगर यांना लोणी पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी अमानुष मारहाण करून त्यांच्या गल्लयातील रोकड हिसकावल्याचा आरोप आहे. तक्रार केली तर परिणाम भागावे लागतील अशा धमक्याही देण्यात आल्याचे खा. लंके यांच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनात पुढे म्हटले आहे की, निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या जिल्हाध्यक्षा विधवा शितल गोरे यांनी कोल्हार येथील प्रकरणाविरोधात फेसबुक लाईव्ह करून प्रश्न उपस्थित केला. याच रागातून उपअधीक्षक भारती यांनी गोरे यांना मारहाण, अश्लाघ्य भाषा व जीवघेण्या धमक्या दिल्या. तुला आणि तुझ्या मुलाला गाडीखाली चिडून टाकीन, अमोल भारती जे बोलतो तेच करतो अशी वारंवार धमकी दिल्याचा गंभीर आरोप आहे. गोरे यांचा मोबाईल हिसकावून त्यातील पुरावे नष्ट केल्याचेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

खा. नीलेश लंके यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे की, लोकशाही व्यवस्थेत पोलीस ही जनतेची सुरक्षा देणारी यंत्रणा आहे, मात्र शिर्डी विभागात नागरिकांवरच दहशत माजवली जात आहे. हा लोकशाही मूल्यांवर थेट आघात आहे. त्यांनी मागण्या केल्या आहेत की, या प्रकरणांतील सीसीटीव्ही फुटेज जाहीर करण्यात यावे, पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांचे निलंब करून चौकशीचे आदेश द्यावेत, या घटनेतील सहभागी पोलिसांवर कठोर कारवाई करण्यात यावी, पोलिस दहशतीविरूध्द आवाज उठवणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी यांना संरक्षण देण्यात यावे. ही घटना संपूर्ण जिल्ह्यात मोठया प्रमाणावर अस्वस्थता व भीती निर्माण करणारी असून यावर कठक, ठोस आणि पारदर्शक कारवाई होणे अत्यावष्यक असल्याचे खा. लंके यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# नाशिकमध्ये खून करून पळालेल्या नगरच्या दोघांना पकडले

नगर – नाशिक शहरातील इंदिरानगर पोलीस ठाणे हद्दीत अनैतिक प्रेमसंबंधातून तरूणाचा खून करून पसार झालेल्या दोघांना नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. प्रफुल्ल दिलीप कांबळे व योगेश बाळासाहेब जाधव (दोघे रा. बोल्हेगाव, अहिल्यानगर) अशी ताब्यात घेतलेल्या दोघांची नावे आहेत.



इंदिरानगर पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे दाखल असलेल्या फिर्यादीनुसार, संतोष अशोक काळे (रा. इंदिरा गांधी वसाहत क्र. ०१, शिवाजी चौक, सिडको, नाशिक) या तरूणाचा दगडाने ठेचून खून करण्यात आला होता. हा खून त्याची पत्नी पार्वती हिने तिच्या प्रियकर प्रफुल्ल कांबळे याच्यासह कट रचून केला होता. गुन्ह्यानंतर प्रफुल्ल कांबळे आपल्या साथीदारासह नगर जिल्ह्यात पळून आल्याची माहिती मिळाली होती. याबाबत नाशिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक हेमंत तोडकर व उपनिरीक्षक संतोष फुंदे यांनी नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण कबाडी यांना माहिती दिली.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक निरीक्षक हरिष भोये यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार विष्णु भागवत, किशोर शिरसाठ, सागर ससाणे, फुरकान शेख, प्रशांत राठोड यांचे पथक तयार करण्यात आले. दरम्यान, पथकाने १३ सप्टेंबर रोजी मिळालेल्या माहितीच्या आधारे शोध मोहिम राबवली. दरम्यान, प्रफुल्ल कांबळे हा नवनाथनगर रस्ता, बोल्हेगाव गावठाण येथे थांबलेला आढळून आला.

त्याला ताब्यात घेतल्यावर चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर त्याचा साथीदार योगेश बाळासाहेब जाधव यालाही ताब्यात घेण्यात आले. त्यांना पुढील तपासासाठी इंदिरानगर पोलीस ठाणे, नाशिक शहर यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

# केडगावमध्ये माजी सैनिकाच्या घरात चोरी; सोन्या चांदीचे दागिने चोरट्यांनी केले लंपास

नगर – केडगाव उपनगरातील मोतीनगर मध्ये असलेल्या साई गॅलक्षी अपार्टमेंट मधील माजी सैनिकाचा फ्लॅट अज्ञात चोरट्यांनी फोडून सोन्या चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास घडली आहे.

याबाबत बाळू रंगनाथ पाचरे (वय ४७) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पाचरे हे मुळचे नगर तालुक्यातील पिंपळगाव कौडा येथील रहिवासी असून सध्या ते जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत आहेत. त्यांचा केडगाव उपनगरात मोतीनगर मध्ये असलेल्या साई गॅलक्षी अपार्टमेंट मध्ये फ्लॅट आहे. १४ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास या फ्लॅटच्या दरवाजाचा कडी कोयंडा तोडून चोरट्यांनी आत प्रवेश करत कपाटातील सोन्या चांदीचे दागिने असा १७ हजारांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# लोकशाहीचा जागर : १५ सप्टेंबर

## आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाचे बहुआयामी महत्त्व

मानवजातीच्या इतिहासातील सर्वात मोठी देणगी म्हणजे लोकशाही होय. जगात आज विविध प्रकारच्या शासनपद्धती अस्तित्वात असल्या तरी लोकशाही हीच एक अशी व्यवस्था आहे जिच्यात प्रत्येक माणसाचे स्थान महत्त्वाचे आहे. सत्ता एका व्यक्तीकडे किंवा गटाकडे केंद्रीत न राहता ती संपूर्ण समाजाच्या, नागरिकांच्या हाती असावी ही लोकशाहीची मूलभूत संकल्पना आहे. त्यामुळे लोकशाही म्हणजे केवळ मतदानाची प्रक्रिया किंवा निवडणुका नव्हेत तर लोकशाही म्हणजे नागरिकांचा सहभाग, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, समानतेची हमी, न्यायाचा अनुभव आणि परस्पर बंधुभावाची जीवनपद्धती होय. लोकशाही म्हणजे केवळ शासनपद्धती नाही, तर ती जीवन जगण्याची एक संस्कृती आहे. समानता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, सहभाग आणि जबाबदारी या लोकशाहीच्या मूल्यांवरच खऱ्या अर्थाने मानवी समाजाचा विकास होऊ शकतो. म्हणूनच १५ सप्टेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्र संघाने 'आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन' म्हणून घोषित केला आहे. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा दिवस म्हणजे जगभरातील देशांना लोकशाही जपण्याची, बळकट करण्याची जाणीव करून देण्यासाठी लोकशाहीच्या मूल्यांचे स्मरण, तिच्या रक्षणाची शपथ आणि नागरिकांच्या सजगतेची आठवण करून देणारा एक जागतिक सोहळा आहे.

लोकशाही ही संकल्पना अत्यंत प्राचीन असून लोकशाहीची मुळे इतिहासात खोलवर रुजलेली आहेत. प्राचीन ग्रीक सभ्यतेत 'डेमॉक्रसी' हा शब्द सर्वप्रथम अस्तित्वात आला. 'डेमॉस' म्हणजे लोक आणि 'क्राटोस' म्हणजे सत्ता. म्हणजेच लोकांच्या हाती सत्ता, हीच खरी लोकशाहीची व्याख्या आहे. प्राचीन ग्रीसच्या अथेन्स नगरराज्यात नागरिक थेट शासन प्रक्रियेत सहभागी होत असत. लोकांच्या चर्चेतून, वादविवादातून, एकमताने निर्णय घेण्याच्या परंपरेतून लोकशाहीची बीजे रुजली आहेत. तथापि आधुनिक अर्थाने लोकशाहीचा पाया अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात रचला गेला. फ्रेंच क्रांतीत उच्चारित झालेली स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता ही घोषणा आजही जगभरातील लोकशाहीची प्राणप्रतिज्ञा मानली जाते.

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा केवळ औपचारिक उत्सव नाही तर आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाचा उद्देश हा जगातील नागरिकांना लोकशाहीची खरी जाणीव करून देणे हा आहे. लोकशाही ही मिळविलेली संपत्ती आहे, परंतु ती टिकविण्यासाठी सतत प्रयत्नांची गरज असते. कारण लोकशाही ही स्थिर राहणारी नसून सतत बदलणाऱ्या परिस्थितीशी सुसंगत ठेवावी लागते. हा दिवस लोकशाहीला भेडसावणाऱ्या संकटांची जाणीव करून देतो. आजच्या काळात जगभरात लोकशाहीसमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. जगातील काही देशांत अजूनही हुकूमशाहीचे सावट आहे, काही ठिकाणी निवडणुका होतात, परंतु त्या फक्त नावापुरत्या असतात, तर काही ठिकाणी मतभिन्नतेला दडपले जाते. माध्यमांवर बंधने, नागरिकांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध, अल्पसंख्यांकांवर अन्याय, महिलांची उपेक्षा, दहशतवाद, भ्रष्टाचार, आर्थिक असमानता, धार्मिक कट्टरता, डिजिटल माध्यमांवरील नियंत्रण, सामाजिक विषमता या सर्व गोष्टी लोकशाहीच्या पायाभूत मूल्यांना आव्हान देतात. लोकशाहीचे संरक्षण करणे ही जगातील सर्व नागरिकांची, समाजाची आणि शासनव्यवस्थेची जबाबदारी आहे.

भारतीय संदर्भात लोकशाही हा आपल्या राष्ट्रीय अस्मितेचा अभिमान आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्यासाठी लिहिलेले भारतीय संविधान लागू झाले आणि भारताने स्वतःला सार्वभौम लोकशाही गणराज्य म्हणून घोषित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडविलेले भारतीय संविधान हे जगातील सर्वांत मोठे लिखित संविधान आहे. भारतीय संविधान हे केवळ कायद्याचे दस्तऐवज नाही, तर लोकशाहीच्या मूल्यांचा जाहीरनामा आहे. भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची हमी दिली, सार्वत्रिक प्रौढ मताधिकारामुळे जात, धर्म, लिंग, भाषा, संपत्ती, शिक्षण या कोणत्याही बंधनांशिवाय प्रत्येक प्रौढ नागरिकाला मतदानाचा हक्क मिळाला आहे. हा अधिकार भारतीय लोकशाहीचा कणा असून भारतीय लोकशाहीची सर्वात मोठी ताकद आहे. त्यामुळे भारत आज जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून ओळखले जाते.

लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नव्हेत तर लोकशाही म्हणजे नागरिकांचा सातत्याने सहभाग होय. संसद, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था या सर्व पातळ्यांवर नागरिकांचा सहभाग घडवून आणणे ही खरी लोकशाही आहे. माहितीचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, पत्रकारितेची स्वायत्तता, स्वतंत्र न्यायव्यवस्था, सामाजिक संस्थांची भूमिका आणि विविधतेचा स्वीकार ही लोकशाहीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. तथापि भारतासारख्या विशाल देशात लोकशाही टिकविणे हे सोपे काम नसून आज भारतीय लोकशाही समोर अनेक आव्हाने आहेत. निवडणुकांमध्ये पैसा आणि सत्तेचा दुरुपयोग, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा राजकारणात प्रवेश, मतदारांना फसविणारी आश्वासने, जातीय आणि धार्मिक ध्रुवीकरण, ग्रामीण व शहरी भागातील दरी, महिलांचे आणि अल्पसंख्यांकांचे अपुरे प्रतिनिधित्व, शिक्षण व माहितीच्या अभावामुळे नागरिकांचा मर्यादित सहभाग या सर्व समस्या लोकशाहीला कमकुवत करतात. लोकशाही टिकवण्यासाठी समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून व्यापक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता लोकशाहीचा पाया सामाजिक न्यायात आहे. लोकशाहीचा खरा अर्थ म्हणजे माणसामाणसातील विषमता नष्ट करणे. लोकशाहीमध्ये प्रत्येक माणूस समान आहे, ही संकल्पना केवळ कायद्यातील शब्द नसून सामाजिक जीवनातील आचार बनली पाहिजे. जातीय, धार्मिक, लैंगिक, भाषिक आणि वर्गीय भेदभाव जर टिकून राहिला तर लोकशाही अपुरी ठरते. त्यामुळे समाजातील वंचित घटकांना संधी उपलब्ध करून देणे, महिलांना समान हक्क देणे, अल्पसंख्यांकांचा सन्मान राखणे आणि समाजातील विषमता कमी करणे हे लोकशाहीच्या टिकावासाठी आवश्यक आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या संविधानामध्ये सामाजिक न्यायाचे तत्त्व मांडले आहे. आरक्षण धोरण, अल्पसंख्यांकांच्या संरक्षणासाठीचे विशेष कायदे, महिलांसाठीच्या योजना, वंचित घटकांना सशक्त करण्यासाठीचे प्रयत्न हे सर्व लोकशाहीचे सामाजिक अंग आहे.

आर्थिक बाजूने लोकशाहीचा विचार केल्यास लोकशाही तेव्हाच अर्थपूर्ण ठरते जेव्हा प्रत्येक नागरिकाला समान संधी उपलब्ध होतात. लोकशाहीमध्ये 'संधींची समानता' ही सर्वात महत्त्वाची बाब ठरते. शिक्षण, आरोग्य, रोजगार, सामाजिक सुरक्षा यांची उपलब्धता जर सर्वांना समान प्रमाणात नसेल तर लोकशाही केवळ नावापुरती राहते. आर्थिक विषमता वाढल्यास लोकशाहीचा पाया हलतो. काही लोक अत्यंत श्रीमंत आणि काही अत्यंत गरीब राहिले तर समानतेचा विचार केवळ कागदोपत्री उरतो. त्यामुळे लोकशाही टिकवण्यासाठी आर्थिक न्याय साध्य करणे अनिवार्य आहे. जागतिकीकरण आणि उदारीकरणामुळे आर्थिक विकास झाला असला तरी गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढत चालली आहे. ही दरी लोकशाहीच्या अस्तित्वालाच धोकादायक ठरू शकते. त्यामुळे आर्थिक न्याय साध्य करणे, संसाधनांचे समान वितरण करणे, वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे.


सांस्कृतिक अंगाने लोकशाही ही विविधतेचा उत्सव आहे. भारतासारख्या देशात धर्म, भाषा, प्रथा, परंपरा, संस्कृती यांचे प्रचंड वैविध्य आहे. या विविधतेला सन्मान देणे, भिन्न संस्कृतींना समान स्थान मिळवून देणे, परस्पर संवाद साधणे हे लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. लोकशाहीमध्ये केवळ बहुसंख्यांकांचा आवाज नव्हे, तर प्रत्येक घटकाचा आवाज महत्त्वाचा असतो. लोकशाही म्हणजे एकच विचार सर्वांवर लादणे नव्हे, तर भिन्न विचारांना व संस्कृतींना समान आदर देणे होय.

आजच्या डिजिटल युगात लोकशाहीसमोर नवे प्रश्न उभे राहिले आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती सर्वांपर्यंत झपाट्याने पोहोचत आहे त्यामुळे लोकशाहीमध्ये नागरिकांचा सहभाग वाढला असून आंदोलनांना गती मिळत आहे. परंतु याच माध्यमातून खोटी माहिती, द्वेषपूर्ण प्रचार, ट्रोलिंग, मतप्रभावीत करणाऱ्या मोहिमा यामुळे लोकशाहीची गुणवत्ता धोक्यात येत आहे. माहितीच्या प्रसारात जबाबदारी आणि माध्यम साक्षरता ही लोकशाहीच्या भविष्यासाठी अत्यावश्यक आहेत.

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नाही तर तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे, की आपण नागरिक म्हणून लोकशाही जपण्यासाठी किती प्रयत्न करतो आहोत? आपण आपल्या अधिकारांसोबत जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवतो का? आपण भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवतो का? आपण निवडणुकीत मतदान करतो का? आपण समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतो का? हे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची हीच वेळ आहे. आपण नागरिक म्हणून लोकशाही जपण्यासाठी काय करत आहोत. मतदान करणे ही आपली मूलभूत जबाबदारी आहे. परंतु लोकशाही म्हणजे फक्त मतदान नव्हे, तर सातत्याने शासन प्रक्रियेत सहभाग घेणे आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवणे, अन्यायग्रस्तांना साथ देणे, सामाजिक चळवळींमध्ये सहभाग घेणे, प्रशासनावर लक्ष ठेवणे ही सर्व कामे प्रत्येक नागरिकाने करणे आवश्यक आहे.

तरुण पिढी ही लोकशाहीची खरी आशा आहे. तरुणांमध्ये ऊर्जा, नव्या कल्पना, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि बदल घडवून आणण्याची क्षमता आहे. शिक्षण, रोजगार, तंत्रज्ञान, सामाजिक माध्यमे या सर्व क्षेत्रांतून तरुणांनी लोकशाही अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून तरुणांना लोकशाही मूल्यांचे भान करून देणे हे शिक्षणव्यवस्थेचेही कर्तव्य आहे.

एकूणच, लोकशाही म्हणजे संघर्ष, संवाद, सहभाग आणि जबाबदारी यांचा संगम आहे. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा आपल्याला या मूल्यांची आठवण करून देतो. लोकशाही ही एक प्रवाही प्रक्रिया आहे; ती स्थिर मिळकत नाही. तिला सतत जपावे लागते, अन्यायाविरुद्ध लढावे लागते, नागरिकांनी सजग राहावे लागते. लोकशाहीचे रक्षण हे केवळ सरकारचे नव्हे तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. समानता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या त्रिसूत्रीवर उभारलेली ही व्यवस्था जगातील प्रत्येक माणसासाठी आशेचा दीप आहे. म्हणूनच आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाचे स्मरण करताना आपण प्रत्येकाने लोकशाहीच्या मूल्यांना आत्मसात करणे, त्यांचा प्रसार करणे आणि भावी पिढ्यांसाठी ती अधिक सक्षम ठेवणे हेच खरे कर्तव्य आहे. लोकशाही म्हणजे मानवी संस्कृतीचे सर्वोच्च मूल्य, समानतेचे आश्वासन, स्वातंत्र्याची हमी आणि बंधुत्वाचा आधार आहे. हा दिवस म्हणजे त्या तेजस्वी दीपाची आठवण, जो जगाला अधिक न्याय्य, समतोल आणि मानवतावादी बनविण्यासाठी प्रज्वलित आहे.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,** (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# १५ सप्टेंबर अभियंता दिन

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले.

१९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो.

विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

